


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २२९ •मंगळवार,दि.१८ नोव्हेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# बीडमध्ये क्षीरसागर- पंडित-क्षीरसागर होणार लढत

**बीड जिल्ह्यात निवडणूक रणधुमाळी** | **६ नगराध्यक्ष पदांसाठी १८० उमेदवार मैदानात** | **नगरसेवक पदासाठी २८२ जागांवर २५२६ उमेदवार**





**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्जांचा अक्षरशः पूर आलेला आहे. एकूण २५२६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून, त्यापैकी २८२ नगरसेवक आणि ६ नगराध्यक्ष पदांसाठी निवडणूक होणार आहे. सर्वच पालिकांतून उमेदवारांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला आहे. गेवराई येथे नगरसेवक पदासाठी १३६ तर नगराध्यक्षासाठी २१ अर्ज दाखल झाले. माजलगावमध्ये नगरसेवकांसाठी तब्बल ४९० तर नगराध्यक्षासाठी २१ अर्ज जमा झाले. धारूरमध्ये १५१ नगरसेवक आणि १६ नगराध्यक्ष अर्ज दाखल झाले. अंबाजोगाईत नगरसेवकांसाठी २२४, नगराध्यक्षासाठी ३८ अर्ज आले. परळीमध्ये नगरसेवक पदासाठी ५७१, तर नगराध्यक्षासाठी ३८ उमेदवारांनी अर्ज दाखल केला. तर बीड नगरपलिकेत सर्वाधिक म्हणजे ७६४ नगरसेवक पदासाठी आणि ४७ नगराध्यक्ष पदासाठी अर्ज प्राप्त झाले.

## ● बीडमध्ये तीनही पक्षाकडून तगडे उमेदवार ●

### ▸ डॉ. ज्योती रविंद्र घुंबरे



येथील प्रसिद्ध कान, नाक, घसा तज्ञ डॉ. रविंद्र घुंबरे यांच्या ज्योती घुंबरे या पत्नी आहेत. डॉ. रविंद्र घुंबरे यांचे वडील मिल्ट्रीमध्ये सर्व्हिसला होते. दोन्ही डॉक्टर गेल्या अनेक वर्षापासून बीडमध्ये रुग्ण सेवा करीत आहेत. पहिल्यांदाच त्या राजकारणात प्रवेश करत आहेत. भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून त्यांची उमेदवारी सोमवारी दाखल केली.

### ▸ सौ. स्मिता विष्णू वाघमारे



बीड शहरात अनेक वर्षे नगर सेवक म्हणून विष्णू वाघमारे यांचे सामाजिक कार्य आहे. स्मिताताई वाघमारे या ही नगर सेविका आणि उपनगराध्यक्ष म्हणून बीड नगर पालिकेत त्यांनी चांगली कामगिरी केलेली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. नगर पालिकेच्या राजकारणात वाघमारे कुटुंबिय दीर्घकाळापासून असल्यामुळे त्यांच्याकडे अनुभव मोठा आहे.

### ▸ श्रीमती प्रेमलता पारवे



अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळ या चिन्हावर श्रीमती प्रेमलता पारवे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. श्रीमती पारवे या महसुल खात्यामध्ये नायब तहसिलदार या पदावरून निवृत्त झालेल्या आहेत. सामाजिक कार्यात त्या अग्रेसर असतात. दलित मित्र स्व. मनोहरदादा वंजारे यांच्या त्या कन्या आहेत. राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

### ● बीड – क्षीरसागर– पंडित–क्षीरसागर होणार लढत

**बीडमध्ये आमदार संदीप क्षीरसागर यांनी उमेदवार घोषणेची अखेरच्या काही मिनिटांपर्यंत प्रतीक्षा लावली आणि अर्ज दाखल करण्याच्या फक्त १५ मिनिटांपूर्वी स्मिता वाघमारे यांच्या नावाची घोषणा करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. दुसरीकडे अजित पवार गटाने प्रेमलता पारवे यांना मैदानात उतरवले असून, भाजपकडून डॉ. ज्योती घुमरे, तर वंचित दलित बहुजन आघाडीकडून सारिका जोगदंड रिंगणात आहेत. आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना विकासाचा मुद्दा मागे पडला आहे आणि बीडमध्ये पंचरंगी लढतीचे वातावरण पूर्णपणे तयार झाले आहे.**



*परळी : सौ.संध्या दीपक देशमुख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल*



*गेवराई : राष्ट्रवादीच्या उमेदवारांना विजयी करून गेवराई शहराच्या विकासाला बळ द्या – रणवीर पंडित*



*भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गोपीनाथ गडावर नतमस्तक ; ना. पंकजाताई मुंडे यांनी दिल्या सर्वांना शुभेच्छा !*

### ● धारूर – १६ उमेदवारांमुळे नगराध्यक्षपदासाठी चौरंगी लढत निश्चित

धारूर नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी तब्बल १६ उमेदवार रिंगणात असून २० नगरसेवक पदांसाठी १५१ अर्ज दाखल झाले आहेत. भाजप, राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट या चारही प्रमुख पक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने चौरंगी लढतीची धग वाढली आहे. अनेक वर्षे नगरपरिषदेत एकहाती सत्ता असलेल्या डॉ. स्वरूप हजारी यंदा मैदानात नाहीत. त्यांच्या जागी रामचंद्र निर्मळ भाजपकडून रिंगणात उतरले असून, सर्व पक्षांनी बालेकिल्ला राखण्यासाठी मोर्चेबांधणी वेगवान केली आहे.

### ● गेवराई – २००६ पासून पवारांचे वर्चस्व, पवार विरुद्ध पंडित सरळ लढत

गेवराईत २००६ पासून माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे वर्चस्व कायम आहे. यंदा अमरसिंह पंडित यांच्या समोर माजी मंत्री बदामराव पंडित यांनी पूर्ण ताकदीने आव्हान उभे केले आहे. नगराध्यक्षपदासाठी पंडित गटाने शीतल दाभाडे तर पवार गटाने गीता पवार यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना शिंदे गटही सामन्यात उतरत असल्याने चौरंगी लढत निश्चित झाली आहे. मात्र प्रत्यक्षात पवार विरुद्ध पंडित अशी थेट दंगल रंगण्याचा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

### ● माजलगाव – पाच पक्षांचे उमेदवार रिंगणात, बहुकोनी लढतीची रंगत

माजलगाव नगरपरिषद निवडणुकीत पाच प्रमुख पक्षांनी आपापले उमेदवार थेट मैदानात उतरवले आहेत. भाजपने संध्या मेंडके यांच्यावर विश्वास दाखवला असून, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून मेहेरीन बिलाल चाऊस, शिवसेना शिंदे गटाकडून राधा येवले, तर ठाकरे गटाकडून सोनाली पैंजणे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. माजी सभापती नितीन नाईकनवरे यांच्या पत्नी मनीषा नाईकनवरे यांनीही स्वतंत्रपणे अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे माजलगावात बहुकोनी लढत तापणार हे निश्चित झाले आहे.

### ● परळी – मुंडे बहिण–भाऊ एकत्र; तरीही उमेदवारीत तिढा कायम

परळी नगरपरिषद निवडणुकीत मुंडे घराण्यातील बहिण–भाऊ एकत्र येण्यावर शिक्कामोर्तब झाल्याने शहरातील राजकारणात खळबळ उडाली आहे. मात्र नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवारीवर दोन्ही पक्षांत अजूनही अंतिम तोडगा काढता आलेला नाही. भाजप आणि राष्ट्रवादी दोन्ही बाजूंनी अर्ज दाखल झाले असले तरी वाटाघाटी पूर्ण न झाल्याने कोण अर्ज मागे घेतात याकडे उत्सुकता आहे. अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत संपल्यानंतरच परळीचे चित्र स्पष्ट होणार असून, या वेळी चौरंगी लढत होण्याची शक्यता प्रबळ आहे. मुंडे घराण्याचे ऐतिहासिक राजकीय वजन लक्षात घेता परळीत पुढील काही तासांत घडामोडींना वेग येणार आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक थांबणार का ? सुप्रीम कोर्टातून मोठी बातमी



**नवी दिल्ली**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रक्रियेत ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टाने सोमवार १७ नोव्हेंबर रोजी राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला इशारा दिला आहे. न्यायमूर्ती सूर्या कांत आणि ज्योमल्या बाघची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ‘कोर्टाच्या अधिकारांची परीक्षा घेऊ नका. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडता येणार नाही. २०२२ च्या जे.के. बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वीची स्थिती कायम राहील.’ या निर्णयामुळे ३० ते ४० नगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये ओबीसी आरक्षण ५० टक्के पेक्षा जास्त गेले असल्यास ते रद्द होण्याची शक्यता आहे.

कोर्टाने म्हटले की, राज्य सरकार आणि आयोगाने घटनापीठाच्या ६ मे २०२५ च्या आदेशाचा विपर्यास करू नये. चालू निवडणूक प्रक्रियेचा हवाला देऊन मर्यादा ओलांडता येणार नाही. जर असे केले तर कोर्ट निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करेल आणि थांबवेल. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या विनंतीवर पुढील सुनावणी १९ नोव्हेंबरला ठेवण्यात आली असून, राज्य सरकारने दोन दिवसांत आपली भूमिका स्पष्ट करावी, असे कोर्टाने सांगितले. सुप्रीम कोर्टाने मे २०२५ मध्ये ओबीसी आरक्षणाला मंजुरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी
## आरोपीस २० वर्ष सश्रम कारावास

### • बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीचा ३१ ऑगस्ट २०२३ व एक सप्टेंबर २०२३ रोजी लैंगिक छळ करणाऱ्या शिरूर तालुक्यातील नराधमास वीस वर्ष सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश – १ एस एस घोरपडे यांनी दिली आहे.



या प्रकरणातील फिर्यादी २ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळच्या सुमारास घरी आले. यावेळी नातवंडामध्ये भांडण झाली होती. यावेळी नातवाने थांब तू काल काय केले होते हे घरच्यांना सांगतो अशी बहिणीला धमकी दिली. यावेळी नातीला याबाबत विचारणा केली असता ती मोठ्याने रडू लागली. विश्वासात घेऊन विचारणा केल्यानंतर तिने सांगितले की, ३१ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी दीड वाजता शाळा सुटून घरी आले असता आरोपी दारामध्ये बसलेला होता. त्यावेळी दुसऱ्या आरोपीने त्याच्या घरासमोर उभे राहून मला बोलावून घेतले. माझ्या अंगाला हात लावला. नेमका त्याच वेळी भाऊ बोलवायला आला त्याने दारातून आवाज दिल्यामुळे आरोपीने मला सोडले व मी घरी आले. पीडीतेने शिरूर पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर




*शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बीड शहरातील प्रभाग क्र ८ (ब ) मधून सौ. मनीषा उल्हास गिराम यांची अधिकृत उमेदवारी दाखल.*

## माजलगावात होलसेल दुकान फोडून दहा लाखाच्या सिगरेट पळवल्या !

**माजलगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सर्वत्र चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे.गजानन नगर रोडवर असलेल्या श्रीकृष्ण ट्रेडर्स या होलसेल दुकानाचे शटर वाकून चोरट्याने आतील दहा लाख रुपये किमतीचे सिगारेटचे आठ बॉक्स व नगदी ७५ हजार रुपये लंपास केल्याची घटना सोमवारी



सकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चार ▶▶ उर्वरित पान २ वर

# पुण्यातील नवले ब्रिजवर पुन्हा अपघात

## कंटेनरची तीन-चार वाहनांना धडक, वाहतूक जाम

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील नवले पुलावरील अपघातांची मालिका थांबता थांबेना असेच चित्र पाहायला मिळत आहे. कारण, गुरुवारी येथील पुलावर झालेल्या भीषण अपघातानंतर आज पुन्हा एकदा अपघात झाला.

नवले ब्रिजजवळ तीव्र उतारावरून येत ४ ते ५ गाड्यांना धडक दिल्याने गाड्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. सुदैवाने या अपघातात जिवीतहानी झाली नाही. मात्र, कारचे मोठे नुकसान झालं आहे. अपघातात एक कंटेनरसह तीन चारचाकी वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती आहे, तीव्र उतारावरून पुढे आलेल्या गाड्या एकमेकांना धडकल्याने हा अपघात झाला. नवले पुलावर गेल्याच आठवड्यात झालेल्या अपघाताच्या जखम्या



ताज्या असतानाच आणखी एका अपघाताची घटना घडली. दुपारी नवले पुलाच्या तीव्र उतारावर चार ते पाच गाड्यांची एकमेकांना जोरदार धडक झाली आहे. दरम्यान, गेल्या आठवड्यात गुरुवारी नवले पुलावर भयंकर अपघात झाला होता, त्यामध्ये आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता. दुपारच्या वेळी नवले पुलाच्या तीव्र उतारावर पुन्हा एकदा अपघाताची घटना घडली आहे. पुण्यातील या पुलावर आठवडाभरात दुसरी मोठी दुर्घटना घडल्याने प्रवाशांमध्ये चिंता व्यक्त करण्यात येत आहे. अपघाताचे नेमकं कारण काय? याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, आजपासूनच नवले ब्रिजवरील वाहतूक धीम्या गतीने करण्यात आली होती. कारण, येथील पुलावरुन प्रवास करताना वाहनांना ▶▶ उर्वरित पान २ वर



# बालपणाच्या सुरक्षिततेची सामाजिक जबाबदारी

१८ नोव्हेंबर हा दिवस 'बाल लैंगिक शोषण, गैरवर्तन आणि हिंसाचार प्रतिबंध आणि उपचारांसाठी जागतिक दिन' (World Day for the Prevention of and Healing from Child Sexual Exploitation, Abuse, and Violence) म्हणून जगभर साजरा केला जातो, आणि हा दिवस केवळ स्मरणाचा नाही, तर समाजाला मुलांच्या संरक्षणाची आणि पुनर्संचयाच्या जबाबदारीची पुन्हा एकदा जाणीव करून देणारा आहे. याच पार्श्वभूमीवर, नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) Crime in India – 2023 अहवालातील आकडेवारी मुलसंरक्षणाच्या दृष्टिकोनातून धक्कादायक कार्यप्रकरणे उघड करते. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार २०२३ मध्ये देशभरात १७७३३५ मुलांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत, जो आकडा २०२२ च्या तुलनेत ९.२% ने अधिक आहे. मुलसंख्येनुसार, हा गुन्हे दर "प्रति १००००० मुलांमध्ये ३९.९" इतका आहे, जो २०२२ मधील ३६.६ पेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालात दोन गुन्हेगारी प्रकार विशेषतः चिंताजनक आहेत. एक म्हणजे Kidnapping and Abduction of Children यात ७९८८४ प्रकरणे नोंदली गेली आहेत, म्हणजे अंदाजे ४५% सर्व बाल गुन्ह्यांचा भाग. दुसरा मोठा प्रकार आहे Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act अंतर्गत गुन्हे या श्रेणीत ६७६९४ प्रकरणे आहेत, जी एकूण गुन्ह्यांच्या सुमारे ३८.२% आहेत. हे आकडेगणित दाखवतात की मुलांना फक्त भौतिक हरवण्याचा धोका नाही, तर त्यांच्या लैंगिक सुरक्षिततेवरदेखील खोल धोक्यांची घंटा आहे.

POCSO अंतर्गत, अहवालात penetrative sexual assault प्रकारात ४०४३४ प्रकरणे आहेत, आणि यात ४०८४६ पीडित मुलांचा समावेश आहे. या प्रकारातील अपराधी ३९०७६ प्रकरणांमध्ये मुलांसाठी परिचित व्यक्ती होते म्हणजे कुटुंबातील सदस्य, शेजारी, नातेवाईक किंवा ऑनलाईन मित्र. हा "विश्वासाचा दुरुपयोग" आपल्या पारंपारिक सामाजिक संरचनांमध्ये किती खोलवर आहे हे उघड दाखवतो; जिथे मुलांचा संरक्षक असावा अशी अपेक्षा आहे, तेथेच शोषणाची



शक्यता वाढते. त्याचबरोबर अहवालात aggravated assaults and harassment POCSO च्या सेक्शन ८ व १० व IPC च्या सेक्शन ३५४ अंतर्गत २२४४४ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. हे प्रकार धमकावणे, सतत त्रास देणे, आत्म-सन्मान खालावणे या भावनिक आणि मानसिक हिंसेचे स्वरूप दर्शवतात, ज्या मुलांच्या मनावर खोल आणि दीर्घकालीन परिणाम करतात. या प्रकारांच्या माध्यमातून समाजाने मुलांच्या हक्कांचे पुनर्विचार करायला हवा केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर संवेदनशीलता, विश्वास पुनर्स्थिती आणि पुनर्बांधणी देखील अत्यावश्यक आहे.

पीडित मुलांचे वयविभाजन पाहताना, अहवालात असे सांगितले आहे की ७६२ मुलं सहा वर्षांखालची, ३२२९ मुलं सहा ते बारा वर्षे, १५४४४ मुलं बारा ते सोळा वर्षे, आणि २१४११ मुलं सोळावी ते अठरावी वर्षे यामध्ये आहेत. एकूण ४०८४६ पीडित. हे वयोगट विभाजन हे दाखवते की या गुन्ह्यांचा प्रभाव ज्या वयोगटांमध्ये मुलं सर्वात अधिक असुरक्षित असतात त्यांच्या जाणीवशीलतेच्या टप्प्यावर तिथेच आहे. हे लहान वयात होणारे शोषण मुलांच्या आत्मविश्वास, सामाजिक संवाद, शैक्षणिक यश व भावनिक सुरक्षिततेवर खोलवर परिणाम करू शकतात, आणि हे प्रभाव समाजात दीर्घकाल टिकू शकेल.

राज्यानिहाय डेटा देखील चिंताजनक आहे. उदा. मध्य प्रदेशमध्ये २२३९३ प्रकरणे नोंदली गेली आहेत, तर महाराष्ट्रात २२३९० प्रकरणे आहेत. या आकड्यांमध्ये सामाजिक-आर्थिक असमानता, प्रशासकीय क्षमता, लोकसंख्या घनता आणि स्थानिक सुरक्षितता यांचा खोल संदर्भ आहे. या फरकांमुळे मुलांच्या संरक्षकतेच्या धोरणांमध्ये स्थानिक स्तरावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे; एकसारखी राष्ट्रीय धोरणे पुरेशी नसतात, कारण प्रत्येक भागाची आपली वैशिष्ट्ये आणि समस्या असतात.

डिजिटल युगात मुलांसाठी धोके अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. NCRB डेटा दर्शवितो की सायबर गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे, जिथे मुलांविरुद्ध ऑनलाईन फसवणूक, ब्लॅकमेलिंग, अश्लीलता आणि शोषणाचे प्रकार नवे प्रमाण घेऊन येत आहेत. तंत्रज्ञानाने मुलांना स्वतंत्र संवाद व माहितीचा प्रवेश दिला असला, तरी समानवेळी त्यांना नव्या प्रकारच्या असुरक्षिततेशी सामोरे जावे लागत आहे. शाळा, कुटुंबे आणि स्थानिक समुदायांनी मुलांना डिजिटल साक्षरता, ऑनलाईन सुरक्षिततेची माहिती आणि तक्रार नोंदविण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर शिकविणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, हे सर्व आकडे "शक्ती आणि अवलंबित्व" यांच्या गुंतागुंतीवर आधारित आहेत. मुलांचा अवलंबित्व म्हणजे त्यांचा विश्वास असणारी व्यक्ती वा संस्था, पण जेव्हा अवलंबित्वाचा दुरुपयोग होतो, तेव्हा समाजातील संरचनात्मक असमानता, लिंगाधारित सत्ता, कलंक व मौन संस्कृती हे मुद्दे खोलवर उभी राहतात. मुलांना तक्रार करण्यासाठी सुरक्षित व्यासपीठ नाही किंवा त्यांनी आवाज उठावला तर "लोक काय म्हणतील" याची भीती असते, हे गंभीर असून हे बदलण्याचे दायित्व संपूर्ण समाजाचे आहे.

उपचाराचा स्तर म्हणजे healing हा फक्त शारीरिक पुनर्प्राप्तीपुरता मर्यादित नाही. गुन्ह्यांनंतर मुलांना त्यांच्या मानसिक वेदना, आत्मविश्वास गमावलेलेपणा, भविष्यातील भीती यांवर काम करण्याचा मार्ग द्यायला हवा. यासाठी समुपदेशन, मनो थेरपी, कुटुंब-समुपदेशन, पुनर्बांधणी केंद्रे, शैक्षणिक पाठबळ आणि सामाजिक पाठबळ या सर्वांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. समाजाने मुलांना "पुनरजीवनाचा हक्क" देण्याची संस्कृती विकसित करावी हे फक्त कायदेशीर कर्तव्य नसून नैतिक व मानवी दायित्व आहे.

कायद्याच्या पातळीवर, POCSO Act आणि इतर कायदे उपलब्ध असले तरी त्यांची अंमलबजावणी आणि पुनरावलोकन महत्वाचे आहे. तपास प्रक्रियेतील विलंब, पुराव्यांची कमतरता, न्यायालयीन विलंब आणि दोषींच्या शिक्षेचा अभाव हे अडथळे कायम आहेत. यासाठी विशेष बाल-मैत्रीपूर्ण तपास यंत्रणा, त्वरित प्रतिसाद गट (rapid response), समुपदेशन समर्थन आणि विशेष बाल न्यायालयांची आवश्यकता आहे.

समाजात बदल घडविण्यासाठी आवश्यक आहे व्यापक जनजागृती, सहभागी संरचना व सामुदायिक संवाद. शाळांमध्ये मुलांना "बॉडी ऑटोनॉमी", "ना म्हणण्याचा अधिकार" व "गुड टच-बॅड टच" यावर शिक्षण देणे महत्त्वाचे आहे; पालकांसाठी संवाद कौशल्ये व संरक्षकतेबाबत प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे; स्वयंसेवी संस्था व स्थानिक गट बाल संरक्षण मोहीम राबवू शकतात. माध्यमांनी दोषारोपापेक्षा पुनर्बांधणीच्या गोष्टींवर मार्गदर्शक संवाद निर्माण करणे आवश्यक आहे. सरकारने दीर्घकालीन धोरणात्मक गुंतवणूक वाढवावी पुनर्बांधणी केंद्रे, समुपदेशन सेवा, डिजिटल सुरक्षितता संस्थांना पाठबळ, आणि शेल्टर होम्स यांसाठी निधी देऊन मुलांच्या पुनरजीवनाची पायाभरणी करावी. ही गुंतवणूक फक्त खर्च नाही तर समाजाच्या नैतिक आणि भावनिक स्वास्थ्यात एक गुंतवणूक आहे.

१८ नोव्हेंबरचा हा दिवस फक्त स्मरणाचा दिवस नाही तर तो एक संघटित सामाजिक संकल्पाचा दिवस असावा. समाजाने प्रतिज्ञा करावी की मुलांचे संरक्षण, त्यांचे पुनरजीवन आणि त्यांच्या हक्कांची राखणी यासाठी आपण एकत्र काम करू, कारण मुलांचं बालपण सुरक्षित असेल तरच आपला समाज खऱ्या अर्थाने प्रगत आणि मानवतावादी असेल. आपण फक्त निरीक्षक न राहू, तर कर्ते बनुया; कारण मुलांचे भवितव्य त्यांच्या सुरक्षेत व संरक्षणातच दडलेले आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

◆ पान ४ वरून पुढे...

## स्थानिक स्वराज्य....

दिली होती, पण आयोगाच्या अहवालानुसार २७ टक्के कोटा लागू करण्यासाठी 'ट्रिपल टेस्ट' पाळणे आवश्यक आहे. यापूर्वी २०२१-२२ मध्ये कोर्टाने आरक्षण थांबवले होते, यामुळे निवडणुका रखडल्या. दरम्यान, राज्यात काही ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामध्ये गडचिरोली, हिंगोली, वर्धा, चंद्रपूर, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, नांदेड, नाशिक या जिल्ह्यांचा समावेश असण्याची शक्यता आहे. आता राज्य सरकारची भूमिका काय असेल, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## अल्पवयीन मुलीचा...

ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध कलम ३७६ अ, ३७६ ड, भा द वि तसेच ५ (ग),६,११(१)१२ बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. या प्रकरणाचा तपास पिंक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक डीपी कोळेकर यांनी केला. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरोधात दोषारोप पत्र दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ मा. एस एस घोरपडे यांच्या न्यायालयापुढे झाली. दरम्यान आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्ष तर्फे आठ साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणात पिडिता प्रत्यक्षदर्शी साक्षीदार वैद्यकीय अधिकारी तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा. सरकारी वकील अजय तांदळे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस कलम सहा बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये दोषी ठरवून वीस वर्षे सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## पुण्यातील नवले...

३० च्या स्पीडने गाडी चालवणे बंधनकारक केले होते. मात्र, तरीही अपघाताची घटना घडली आहे. दरम्यान, गेल्या आठवड्यात झालेल्या भीषण अपघातानंतर पुण्यातील नेत्यांनी आणि प्रशासनाने बैठक घेऊन उपाययोजना करण्यासंदर्भात आढावा घेतला आहे.

## माजलगावात होलसेल...

चोरट्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील गजानन रोडवर श्रीकांत श्रीनिवास रुद्रवार यांचे श्रीकृष्ण ट्रेडर्स हे होलसेल दुकान असून ते नेहमीप्रमाणे रविवारी रात्री लवकर दुकान बंद करून गेले होते. सोमवारी त्यांना सकाळी सात वाजता शेजारील दुकानदाराने फोन करून सांगितले की तुमचे दुकान फोडले असून तुम्ही तात्काळ इकडे या, यावर ते दुकान कडे गेले असता त्यांना दुकानचे शटर वाकलेले दिसले. आत प्रवेश केला असता दुकानातील सिगरेटचे दहा लाख किमतीचे आठ बॉक्स व गल्ल्यातील नगदी ७५ हजार रुपये गायब असल्याचे दिसून आले. तर दुकानातील सीसीटीव्हीचा डीव्हीआर ही चोरट्याने तोडून नेल्याचे दिसले. यावरून त्यांनी बाजूला असलेल्या बँकेचे सीसीटीव्ही चेक केले असता दुकान समोर सकाळी पाच वाजता स्विफ्ट गाडीत आलेल्या चार चोरट्यांनी सिगरेट बॉक्स पळवल्याचे दिसून आले.शहर पोलीस आणि घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्हीची पाहणी करत शहरात अनेक ठिकाणी या वेळेचे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले आहे. याप्रकरणी दुकान मालक श्रीकांत श्रीनिवास रुद्रवार यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चार चोरट्याविरुद्ध शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत

◆ पान 9 वरून पुढे...

## अनेक दिवसांची....

उद्धव विधाते, हे उपस्थित होते. आमदार सुरेश धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा निधी मंजूर करून घेतला असून १. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी, २. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा-हिवरा - १ कोटी ५४ लाख रुपये निधी, ३. प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी-बोरोडी - ३ कोटी ५० लाख रुपये निधी, ४. लोणी ते खुंटेफळ-वाटेफळ १ कोटी रुपये निधी,या चार ही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ सोमवार दि.१७ नोव्हेंबर रोजी पार पडला. शुभारंभ प्रसंगी परिसरातील पदाधिकारी, विद्यार्थी, नागरीक,महिला मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की,शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नासाठी राज्य सरकार कटीबद्ध असून जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तयारी दर्शवली आहे. कर्जमाफी करताना २००७ पासून असलेली जुने कर्ज प्रकरणे मागे राहतात त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत या कर्जाबाबत निर्णय होणे आवश्यक आहे त्यामुळे शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी आपण मुख्यमंत्री यांना भेटणार असल्याचे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले. पुढे बोलतांना आ. धस म्हणाले,रस्ता हा दर्जेदार झाला पाहिजे अशी सर्वांनीच मागणी केली आहे. आणि त्या पध्दतीनेच हा रस्ता दर्जेदार होणार असल्याची ग्वाही आ.धस यांनी दिली. वाघळुज ते अंभोरा ह्या रस्त्याचे काम पावसामुळे दिरंगाई झाले आहे. आता लवकरच ते काम मार्गी लागणार आहे. याठिकाणी असलेल्या अंबरा या ठिकाणी पोलीस ठाणे नवीन इमारत आणि कर्मचाऱ्यांसाठी वसाहत बांधकामासाठी आठ ते दहा कोटी रुपये मंजूर होणार असून आपण त्यासाठी प्रयत्न करत आहोत लवकरच या कामास मंजुरी मिळणार आहे प्रस्ताव मंत्रालयात मंजुरीसाठी असून लवकरच हे काम मार्गी लागणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले. माजी आ. साहेबराव दरेकर म्हणाले की, गुत्तेदारांनी हे काम कसे चांगले करील यासाठी गावकऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. यामध्ये गट-तट बाजुला ठेऊन विकास कामांसाठी एकत्रित येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सरपंच सागर आमले म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रस्त्याचे काम आ.धस यानी मार्गी लावले पण आता संबंधित गुत्तेदारांनी हे काम चांगले दर्जाचे करावे अशी मागणी सरपंच आमले यांनी केली. कार्यक्रमाची प्रस्तावना शाखा अभियंता सुनील राठोड यांनी केले. तालुक्यातील पहिली वेबसाईट असलेली ग्रामपंचायत अंभोरा सर्व कारभार ऑनलाईन पध्दतीने सुरू असून यामध्ये अंभोरा ग्रामपंचायतीचा पारदर्शी असलेला कारभार जगभरामध्ये कोणालाही पाहता यावा यासाठी अंभोरा ग्रामपंचायतची स्वतंत्र व्यवसाय निर्माण करण्यात आली आहे सरपंच सागर आमले यांच्या पुढाकाराने वेबसाईट सुरू करण्यात आली. त्या वेबसाईटचा शुभारंभ आ. सुरेश धस यांच्याहस्ते करण्यात आला. बिहार निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या अभूतपूर्व यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार सुरेश धस म्हणाले की राजद शासन म्हणजे जंगल राज होते शहाबुद्दीन सारखा खासदार ऍसिड ची आंघोळ घालून माणसे मारत होता अशा पक्षाला लोक कसे मत देतील असे सवाल करून बिहारमध्ये

◆ पान 9 वरून पुढे...

जात-पात धर्मवीरहित भाजपाला मतदान झाले आहे बिहारमध्ये चांगल्या कामामुळे यश बिहारमध्ये विरोधकांच्या सभेला असलेली गर्दी मतांमध्ये बदलली नाही पण तर त्यांनी भाषणामध्ये नरेंद्र मोदी यांच्या आईला अपशब्द मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या बद्दल खालच्या भाषेत प्रचार केल्यामुळे लोकांनी त्यांना त्यांची जागा दाखवली आहे. बिहारमध्ये चांगल्या कामामुळे यश मिळाले असल्याचे आ.धस यांनी सांगितले.या रस्ते कामांचा झाला आज शुभारंभ राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी,राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा-हिवरा - १ कोटी ५४ लाख रुपये निधी,प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी बोरोडी - ३ कोटी ५० लाख रुपये निधी,लोणी ते खुंटेफळ - वाटेफळ १ कोटी रुपये निधी, या चार ही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ आ. धस यांच्या हस्ते करण्यात आला. नांदूर विठ्ठलाचे या ठिकाणी नदीवरील उच्चस्तरीय पुलाची आवश्यकता असल्यामुळे त्यासाठी ही प्रयत्न करण्यात येतील आणि येथील प्रसिद्ध देवस्थान कपारीचा विठोबा या ठिकाणी प्रसाद या योजनेतून भावी भक्तांसाठी भक्तनिवास स्वच्छतागृह आदी सुविधा निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत लवकरच या कामांना मंजुरी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले तर खरड गव्हाण फाटा या ठिकाणी प्रमुख जिल्हा मार्ग एक ते पारोडी बोरुडे या रस्त्याला तीन कोटी ५० लक्ष रुपये एवढा खर्च येणार असल्याने या परिसरातील जनतेची वाहतुकीची मोठी सोय होणार आहे तसेच सीना प्रकल्प मध्ये आष्टी तालुक्यातील गावातील जमिनी जाऊन त्यांना पाणी मिळत नसल्याची खंत जयसिंग गव्हाणे यांनी व्यक्त केली त्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी सीना प्रकल्पातील बॅकवॉटर मधून पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

## ३६ व्या परिक्षेत्रीय....

या प्रसंगी बोलताना त्यांनी म्हटले- कोणतेही काम करताना १००% प्रयत्न, शिस्त, निष्ठा आणि काम हीच पूजा अशी भावना ठेवली, तर यश निश्चित मिळते. बीड जिल्हा पोलीस दलाने पुढील काळातही अशीच उत्तरोत्तर गौरवास्पद कामगिरी करत राहावी. या कार्यक्रमाद्वारे बीडमध्ये पहिल्यांदाच पदकविजेत्या खेळाडूंसाठी स्वतंत्र अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षकांच्या या प्रेरणादायी कृतीमुळे खेळाडूंमध्ये नवचैतन्य, उत्साह आणि आत्मविश्वास संचारला आहे. याप्रसंगी पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांचे समवेत अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. वेंकटराम, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे व जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व खेळाडू अंमलदार उपस्थित होते.

## 'नगराध्यक्षा' पदासाठी....

कचरा व्यवस्थापन व व्यवस्थापन प्रकल्प हमीने यशस्वी करण्यात येतील. २) शहरातील पाणी पुरवठ्याची समस्या तसेच शुद्ध पाण्याची समस्या हमीने सोडविण्यात येईल. ३) बारगळलेले पाणी पुरवठा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना हमीने केल्या जातील. ४) पूर्ण शहरामध्ये विद्युत

◆ पान 9 वरून पुढे...

पथदिवे लावून शहर अंधकार मुक्त करण्याची मोहीम हमीने राबविण्यात येईल. ५) शहरामध्ये दुर्गंधी व रोगराईसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना हमीने केल्या जातील. ६) मोकाट जणावरे मुक्त शहर योग्य त्या उपाय योजना करुन हमीने केल्या जाईल. ७) पूर्ण शहरामध्ये रस्ते व नाल्या करण्यासाठी महामोहीम हाती घेतली जाईल. ८) नगर पालीकेचा कारभार आणि व्यवहार पूर्ण पणे पारदर्शक व सार्वजनिक स्वरुपाचा हमीने केला जाईल. ९) नगर पालीकेची विकासकामे तांत्रिक दृष्ट्या प्रमाणित, १००% दर्जेदार व दुरदृष्टी ठेऊन हमीने केल्या जातील. १०) नगर पालीकेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन प्रश्न, आवश्यक ती नोकर भरती, निलंबीत कर्मचाऱ्यांचे प्रश्न संवेदनशिल पणे हताळण्यात येऊन, योग्य त्या उपाय योजना करुन हमीने निकाली काढण्यात येतील. ११) पारदर्शक व भ्रष्टाचार मुक्त कारभाराचे ध्येय साध्य करुन शहर सुशोभीकरणासह, सर्व धार्मिक स्थळांचे जतन, लहान थोरांसाठी अद्यावत दर्जेदार उद्याने निर्मिती प्रकल्प, ठिकठिकाणी गरजेनुसार अद्यावत स्वच्छता गृहे निर्मितीसाठी तसेच मुलभुत नागरी समस्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी योग्य त्या उपाय योजना हमीने हाती घेतल्या जातील. १२) नगरपालीकेच्या माध्यमातुन विशेष तज्ञ कल्पकतेचा वापर करुन नवीन रोजगार निर्मितीसाठी सातत्याने व हमीने उपाय योजना केल्या जातील. अशा पद्धतीने, बीड शहर बचाव मंच व मित्र पक्ष यांची यांची मरहूम अतहर बाबर साहब शहर विकास आघाडी आपल्या सेवेत रुजू आहे.

## आम आदमी....

समस्या जवळून पाहिल्याचा अनुभव त्यांनी सांगितला. सत्तेपासून दूर राहून प्रश्न मांडले ; आता सत्तेत येऊन त्यांचे समाधान करण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले. विकासकामे, रस्ते, पाणीपुरवठा आणि पारदर्शक प्रशासन हे आपल्या प्राधान्यक्रमातील विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अर्ज दाखलप्रसंगी दोन्ही उमेदवारांसोबत आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक येडे,शहराध्यक्ष सय्यद सादेक सह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाग ६ मध्ये यामुळे निवडणुकीची रंगत आणखी वाढली असून आम आदमी पार्टीकडून जोरदार लढत दिली जाण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणूक प्रचाराला सुरुवात होताच या दोन्ही उमेदवारांच्या प्रचारयोजना, जनसंपर्क आणि स्थानिक प्रश्नांवर त्यांची मते काय असणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नगरसेवक पदाच्या दावेदार...

कामे निस्वार्थपणे केले आहेत. त्यामुळे दादा वार्ड क्रमांक एक मधूनच नाही तर पूर्ण जिल्हाभर नावलौकिक आहेत. त्यामुळे वार्ड क्रमांक एक नगरसेवक या पदाचा दावेदार म्हणून कोकिळा लक्ष्मण दादा पवळ ह्याच आहेत. दादांच्या हातून आजपर्यंत अनेक गरजूवंत गोरगरिबांचे कामे झाली आहेत. दादा कोणत्याही समाज कार्यामध्ये अग्रेसर असतात. त्यामुळे सर्वपरिचित अशी त्यांची ख्याती आहे. येणाऱ्या दोन डिसेंबर ला कोकिळा लक्ष्मण दादा पवळ यांनाच मायबाप जनता निवडून देईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे आणि तशी ग्वाही देखील वार्ड क्रमांक एक मधील सर्व जनतेने दिली आहे. त्यामुळे सौ. कोकिळा लक्ष्मण पवळ ह्याच नगरसेवक पदाच्या खऱ्या

◆ पान 9 वरून पुढे...

दावेदार आहेत..असे वार्ड क्रमांक एक मधून सर्व जनतेच्या तोंडून बोलले जात आहे. आणि त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## कल्याणस्वामी संस्थांनचा...

असून अद्यावत दगडी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. कल्याण स्वामी संस्थान मंदिराचा कलशारोहन व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सांप्रदायातील मान्यवर, नामांकित दिग्गज संस्थानला भेटी देणार आहेत. कलशारोहन कार्यक्रमासाठी नवसारी, सुरत येथील स्वामी श्रीहरी जीवनदास शास्त्री संस्थापक श्रीनारायण मुनी दिव्यधाम, महंत गुरुवर्य महंत शिवाजी महाराज, नारायणगड, न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री, भगवानगड, महामंडलेश्वर महादेवानंद भारती अश्वलिंग संस्थान, महंत विठ्ठल महाराज शास्त्री, गहीनाथ गडकर, शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबा, गोरक्षनाथ टेकडी, महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, महामंडलेश्वर १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, इंदूवासिनी संस्थान, महंत राधाताई सानप महाराज, आईसाहेब संस्थान, महासांगवी आदी साधू, संत उपस्थित राहणार आहेत. सप्ताहात मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर पासून सुरू होणाऱ्या सप्ताहात पहिल्या दिवशी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदुरीकर यांचे कीर्तन, बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी हभप आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड, गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर नोव्हेंबर रोजी गोरक्षक रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर, शुक्रवार दिनांक २१ नोव्हेंबर रोजी गुरुवर्य ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर, शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी धर्मगुरू अमृता आश्रम स्वामी महाराज, बीड यांचे कीर्तन, सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. साधी सोनाली दीदी, अध्यक्ष श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान, चकलांबा यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सप्ताहातील प्रत्येक कीर्तनास महाराष्ट्रातील ख्यातनाम, सुप्रसिद्ध गायक, वादक उपस्थित राहणार आहेत. परिसरातील महंत, गायक, वादक यांचीही या कार्यक्रमास उपस्थिती राहणार आहे.

## बहुजनांच्या मान...

घरातील एक महिला शहराच्या विकासासाठी पुढे यायला हवी, असा विचार मनात ठेवूनच सुषमा जोगदंड यांनी निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली आहे.या वेळी बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष भीमराव कुट्टे यांनी शहरवासियांना एकजुटीचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, आज वेळ आली आहे प्रस्थापितांना धडा शिकवण्याची. विकासाच्या नावावर पोकळ गप्पा मारणाऱ्यांना खरा विकास करून दाखवण्याची. ही बहुजन समाजाच्या अस्मिता, मान-सन्मान आणि स्वाभिमानाची लढाई आहे. बीड पालिकेचा कारभार पारदर्शक करण्यासाठी सुषमा राजू जोगदंड यांना एकदा संधी द्या. कुट्टे यांच्या या भूमिकेमुळे निवडणुकीत बहुजनांची एकजूट आणि नव्या नेतृत्वाला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# येणारा काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटर नूतन वास्तू उद्घाटन



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

आयुर्वेद या निसर्गाशी अनुरुप उपचार पद्धतीचे महत्त्व जगभरात मान्य झाले आहे. आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचारात वापर, संशोधन अशा विविध प्रकारे चालना दिली असून येणारा काळ हा आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. येथील सातार तांडा भागातील श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज एण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. राज्याचे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड, श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे,सचिव संगिता मंगरुळे, रुग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख, अधिष्ठाता स्वाती इटगे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, भारतीय जीवनपद्धतीस अनुकूल व निसर्गाशी साधर्म्य सांगणारी ही उपचार पद्धती वेदांमध्ये आयुर्वेद या नावाने सांगण्यात आली आहे. आजाराच्या लक्षणांवर नव्हे तर मुळाशी जाऊन आयुर्वेदात उपचार केले जातात. ही उपचार पद्धती शाश्वत उपचार पद्धती आहे. आयुर्वेद उपचार पद्धतीचा जगभरात वापर वाढत आहे. भारतात आयुर्वेद उपचार पद्धतीने उपचार घेण्यासाठी अनेक लोक येत आहेत. आयुर्वेदाने या जगाला विज्ञाननिष्ठ उपचार पद्धती देऊन शल्यचिकित्सा पद्धतीही दिली आहे. कोविड काळामध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या पूरक औषधांमध्ये आयुर्वेदीक औषधींचा सर्वाधिक समावेश होता. केंद्र सरकारमार्फत या उपचार पद्धतीला प्रोत्साहन दिले जात आहे. प्रशिक्षित वैद्य तयार करण्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयांना चालना दिली जात आहे. आगामी दशकात भारत हा जगातली प्रमुख अर्थव्यवस्था बनून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेऊ पहात आहे. २०४७ पर्यंत आपला देश आर्थिक महासत्ता झालेला असेल. मराठवाड्यातही आपण उद्योग क्षेत्राला पाठबळ देत असून इलेक्ट्रिक व्हेईकलची कॅपिटल म्हणून छत्रपती संभाजीनगरची ओळख निर्माण होत आहे, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



*सामाजिक कार्यकर्ते तथा राजीव गांधी राज पंचायत समितीचे जिल्हाध्यक्ष आणि भावी नगरसेवक आदरणीय लक्ष्मण दादा पवळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दै. मराठवाडा चे संपादक दत्तात्रेय नरनाळे, दै. अक्षरवार्ताचे संपादक संजय हंगे, संभाजी झावरे, तानाजी बोरोडे, प्रणव पवळ, खंडू भोगल, अशोक घाटे, पंडित गावडे, प्रेम राठोड, अमोल कदम, कृष्णा शिंदे, प्रेमसिंग शहा, प्रशांत रडे, रामेश्वर घुंबर आदी मान्यवर उपस्थित होते.*

# लाडकी बहीण योजनेच्या e-KYC ला मुदतवाढ

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या ज्या महिलांचे ई केवायसी अद्याप झालेलं नाही त्यांच्यासाठी आता महत्त्वाची बातमी आहे. या योजनेच्या ई केवायसी प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. या आधी १८ नोव्हेंबर पर्यंत ई केवायसी करणं बंधनकारक करण्यात आलं होतं. आता त्यासाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरेंनी त्यांच्या सोशल मीडियावरुन या निर्णयाची माहिती दिली आहे. राज्यातील काही भागात



पूराची स्थिती निर्माण झाल्यामुळे, तसेच इतर अडचणींमुळे अनेक लाभार्थी महिलांना ई केवायसी करता आलं नव्हतं. अशा महिलांसाठी आता पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संपूर्ण राज्यात अतिशय यशस्वीरित्या राबवली जात आहे. याबाबत दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी सर्व लाभार्थ्यांनी e-KYC प्रक्रिया करावी अशा सूचना यापूर्वी देण्यात आल्या होत्या. परंतु, गेल्या काही दिवसांत आपल्या राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्ती आणि इतर अडचणींमुळे, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील अनेक पात्र भगिनींना e-KYC प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही, याची मला पूर्ण कल्पना आहे. या अडचणींची गांभीर्याने नोंद घेत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. लाडकी बहीण योजनेच्या e-KYC करण्याची अंतिम मुदत आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचे e-kyc करावे व त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा. न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातील महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे जमा करावे.

# मुलाने घेतला वडिलांच्या खुनाचा बदला, तब्बल 17 वर्ष पाहिली वाट, नांडेदमध्ये एखाद्या चित्रपटाप्रमाणे घडली घटना

**नांदेड । प्रतिनिधी**

बळीरामपूर येथील राष्ट्रपाल कपाळे हा दुकानात बसलेला असताना अज्ञात आरोपींनी धारदार शस्त्रांनी वार करून त्याची हत्या केली. कपाळे एका खून प्रकरणात जामिनावर बाहेर आला होता. २००९ साली कपाळे याने राजू गवळे यांचा खून केला होता. त्या दृष्टीने पोलिसांनी तपास केला असता धक्कादायक बाब समोर




आली. खून झालेल्या गवळे यांच्या २० वर्षीय मुलाने त्याच्या मित्रांच्या मदतीने खूण केल्याचे निष्पन्न झाले. तब्बल १७ वर्षानंतर मुलगा नागेश गवळे याने दोन मित्रांच्या मदतीने कपाळे याचा खून केला. आरोपींनी याबाबत कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितलं आहे. पोलिसांसमोर तपास करताना ओापींची ओळख पटवण्याचं आव्हान होतं. मात्र पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी तीन तासाच्या आत प्रकरण उघडकीस आणलं. शिवाय नागेश राजेंद्र गवळे (वय २०.रा शाहूनगर वाघाळा), अभिजीत राणू गजभारे (वय २० रा.धनेगाव), लकी राजकुमार पारखे (वय १९ रा.गौतमनगर किल्ला रोड) या आरोपींना अटक केली. वडिलांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी खून केल्याचे पोलीस तपासात उघड झालं आहे.



*आष्टी – पत्रकार अक्षय विधाते यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, जेष्ठ पत्रकार निसार शेख,माजी सरपंच विठ्ठल राख,राजु सानप,राजेंद्र लाड, संतोष नागरगोजे,अशोक गोल्हार,पवन विधाते,सुरज शिंदे, दत्ता म्हस्के, शत्रुघ्न तोडकर, सार्थक बनकर , सिराज सय्यद आदी दिसत आहे.*

# महाराष्ट्राची लोककला जगप्रसिध्द: निलम शिर्के – सामंत

**बीड । प्रतिनिधी**

भारत देश हा विविधा कलांनी गुण असणारा देश आहे. प्रत्येक राज्याची आपली विशिष्ट अशी संस्कृती व लोककला आहे. ती जोपासण्याचा व प्रसार, प्रचार करण्याचा व बालकांमध्ये रूजविण्यासाठी प्रत्येक राज्य प्रयत्नशील आहे. ज्ञात असलेल्या, नसलेल्या कलांची ओळख करून ती आपल्या माध्यमातून रसिकांपर्यंत जाणं गरजेच आहे. आपल्यामध्ये विविध कला गुण गुतलेले



असतात. यांची ओळख करून घेऊन सादर करणं आवश्यक आहे. आपल्या आयुष्यात ठामपणे हो नाही म्हणता आलं पाहिजे. प्रत्येक स्पर्धेमध्ये जिंकण्यासाठी सहभागी न होता, आनंद घेण्यासाठी व शिकण्यासाठी सहभागी व्हावे.त्या सोबतच बालरंगभूमीच्या माध्यमातून कला संस्कार शिबीरांचे आयोजन केले जाते. वय वर्ष अठराच्या खालील मुलांना या शिबीरात मोफत प्रवेश आहे. अशा मुलांनी कला संस्कार शिबीरात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.नृत्याचा स्थायी भाव आनंद घेत घेत आनंद देणे हा आहे.बालरंगभूमी मुलांच्या कला गुणांच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे. असे बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलमताई शिर्के सामंत बीड येथील जल्लोष लोककलेच्या या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या.

# सौ.के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनीचा हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक

**बीड । प्रतिनिधी**

रिधम डान्स अकॅडमी हैदराबाद तर्फे राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धा आयोजन हैदराबाद येथे आयोजन करण्यात आली होती. या स्पर्धेत सौ.के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालय बीड मधील विद्यार्थिनी कु.स्नेहा दुधाळ हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेत भारतातील प्रमुख शास्त्रीय नृत्यांमध्ये भरतनाट्यम, कथ्थक, कुचिपुडी, ओडिसी, कथकली,



मणिपुरी, मोहिनीअट्टम समावेश होता. आंतरराष्ट्रीय नृत्य परिषद (उखऊ) ही पॅरिस, फ्रान्समध्ये मुख्यालय असलेली एक जागतिक संस्था आहे, जी नृत्य क्षेत्राला एकत्र आणते. ही णछएडउज च्या संरक्षणाखाली काम करते आणि जगभरातील नृत्याच्या सर्व प्रकारांचे प्रतिनिधित्व करते. ही संस्था सदस्य देश, संघटना आणि व्यक्तींना नृत्यासाठी एक मंच आणि युनेस्कोसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांशी सल्लामसलत करण्यासाठी मदत करते. हि संस्था राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धा घेते. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे सर तसेच सर्व सहकारी प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# शेवटच्या घटकाचा विचार हाच खरा न्याय – न्यायमूर्ती अनिल किलोर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संविधानाने आपल्याला मुलभूत अधिकार दिले आहेत. हे अधिकार शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी न्यायिक अधिका-यांची आहे. नवीन होणारी इमारत सोयीसुविधा युक्त आणि सुसज्ज असली तरी शेवटच्या घटकाचा विचार करून न्यायदान करणे, हेच आपले कर्तव्य आहे, असे विचार मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी व्यक्त केले. बल्लारपूर येथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) नूतन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आणि कोनशिला समारंभात ते



प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अनिल पानसरे, न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर, चंद्रपूरच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृध्दि भिष्म, बल्लारपूर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ङ ईनायत सय्यद, बल्लारपूरच्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) सोनिया सावळेश्वरकर उपस्थित होते.

# प्रत्येक आदिवासी पाड्याला विकासाचा प्रत्यय देवू – केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम

**नागपूर । प्रतिनिधी**

भारतातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी केंद्र सरकार एका कटिबध्दतेने काम करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक विविध विकास योजना जाहीर केल्या. प्रधानमंत्री जनमन व इतर योजनांतर्गत आदिवासी जनजातीसाठी पक्के घर उपलब्ध करुन दिली जात आहेत. २६ राज्य व ४ केंद्रशासीत प्रदेशातील सूमारे ५४९ जिल्हे, २ हजार ९११ तहसील क्षेत्रातील



सूमारे ६३ हजार ८४२ गावातील आदिवासींसाठी विशेष मोहीम असून प्रत्येक आदिवासी पाड्याला आम्ही विकासाच्या प्रवाहात आणू असे प्रतिपादन केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांनी केले.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण व युवक युवती सम्मेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक वुईके, मध्य प्रदेश येथील जनजातीय कार्य मंत्री कुवर विजय शाह, खासदार फग्गनसिंह कुलस्ते, माजी महापौर मायाताई ईवनाते, माजी खासदार समीर उराव, रंजना कोडापे, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, आदिवासी विकास आयुक्त लिना बनसोड, अपर आयुक्त आयुषी सिंह व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कोठा येथे साडी निर्मिती उद्योग उभारणार – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**अमरावती । प्रतिनिधी**

मेळघाटातील आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. कोठा येथील संपूर्ण बांबू केंद्रात बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यात येत आहेत. येत्या काळात या ठिकाणी पाच कोटी रुपयांच्या कोसा साडी निर्मितीचा उद्योग उभारण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. धारणी तालुक्यातील कोठा येथे भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आज कार्यक्रम पार पडला, यावेळी कांचन गडकरी, संपूर्ण बांबू केंद्राच्या अध्यक्ष डॉ. निरुपमा देशपांडे, योगेश बापट आदी उपस्थित होते. श्री. गडकरी म्हणाले, आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

त्यांचा विकास व्हावा, समाजात स्थान मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आदिवासींमध्ये कौशल्य असून त्यास प्रशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. संपूर्ण बांबू केंद्राच्या माध्यमातून बांबूच्या सुबक वस्तू तयार करण्यात येत असून जगभरातील ६० देशांमध्ये या वस्तू पोहोचल्या आहेत.

# महाराष्ट्रातील शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी, बस भाड्यासंदर्भात सरनाईकांची मोठी घोषणा!

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील कानाकोपऱ्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी बस खूप उपयोगी पडते. शाळा-कॉलेजमध्ये जाण्यासाठी हा पर्याय स्वस्त आणि उत्तम ठरतो. दरम्यान महाराष्ट्र सरकारने शाळा-महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी भेट दिली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भात गुड न्यूज दिलीय. काय म्हणाले प्रताप सरनाईक? सविस्तर जाणून घेऊया.

विद्यार्थ्यांसाठी गुड न्यूज – विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीसाठी राज्य रस्ते वाहतूक महामंडळ म्हणजेच एमएसआरटीसी यंदा मोठ्या संख्येने नव्या बस उपलब्ध करुन देणार आहे. याशिवाय सहलीच्या भाड्यात ५० टक्के सूटदेखील मिळणार आहे. दिवाळी सुट्टीनंतर विद्यार्थी उत्साहाने सहलीची वाट पाहत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवास देण्यासाठी ही योजना असल्याचे असे मंत्री म्हणाले.

दररोज ८०० ते १००० बस



– एमएसआरटीसीचे २५१ डेपो दररोज शाळा-कॉलेजांना ८०० ते १००० नव्या बस देणार आहेत. मंत्र्यांच्या कार्यालयाच्या निवेदनात यासंदर्भातील माहिती देण्यात आलीय. या व्यवस्थेमुळे शैक्षणिक प्रवास सोपा होणार असल्याचे सरनाईक म्हणाले. विद्यार्थ्यांसाठी परवडणारी आणि सुरक्षित सहल ही आमची प्राथमिकता आहे. राज्य सरकार या सहलींना पूर्ण पाठिंबा देत असून त्यात ५०% भाडेसवलत देणार असल्याची घोषणा यावेळी सरनाईकांनी केली. यामुळे विद्यार्थी ऐतिहासिक-धार्मिक स्थळांना सहज भेट देऊ शकणार आहेत.

मागील वर्षीची आकडेवारी-नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत एमएसआरटीसीने शैक्षणिक सहलीसाठी १९ हजार ६२४ बस पुरवल्या. यातून सरकारला ९२ कोटी रुपयांचा महसूल मिळाला. ही यशस्वी कामगिरी पाहता यंदा आणखी मोठ्या प्रमाणात बस उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. मंत्री सरनाईक यांनी २०२५-२६ साठी डेपो व्यवस्थापक आणि स्टेशन प्रमुखांना शाळा-कॉलेजांशी समन्वय साधण्याचे आदेश दिले आहेत.

प्राचार्यांशी साधणार संपर्क

डेपो प्रमुख आणि स्टेशन अधिकाऱ्यांना मुख्याध्यापकांना भेटून सहलीची योजना आखण्यास सांगितले आहे. ते राज्यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि धार्मिक ठिकाणांना भेटीचे आयोजन करणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कृतीची ओळख होण्यास मदत होईल. सरकारने घेतलेल्या या पुढाकारामुळे शैक्षणिक सहलींना चालना मिळेल यासोबतच एमएसआरटीसीला अधिक महसूल मिळणार आहे.

योजनेचा उद्देश काय?

एमएसआरटीसीने केलेली ही घोषणा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे. स्वस्त भाडे आणि नव्या बसांमुळे पालकांचा भार कमी होणार आहे. तर विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवासाची हमी मिळणार आहे. राज्यभरातील शैक्षणिक संस्थांना याचा थेट लाभ होणार आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## वडवणीचा तारा थेट मंत्रालयावर चमकला...!

### विठ्ठल रामप्रसाद बादाडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह सहा परीक्षा उत्तीर्ण

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव या छोट्याश्या खेड्यातील तरुण श्री. विठ्ठल रामप्रसाद बादाडे यांनी परत एकदा महाराष्ट्र लोकसेवा




आयोगाच्या मोठ्या पदाला गवसणी घालत, सलग ०६ सरकारी नोकऱ्या मिळवण्याचा विक्रम केला आहे. काडीवडगाव येथील शेतकरी रामप्रसाद राजाराम बादाडे यांचा मुलगा विठ्ठल यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेतच झाले व त्यानंतरचे शिक्षण देवडी येथील रेणूबाई देवी विद्यालयात झाले. विठ्ठल तसा पहिलीपासूनच शाळेत हुशार होता त्याने दहावी मध्ये ८४% गुण घेत द्वितीय क्रमांक पटकावून पुढील उच्च शिक्षणाची तयारी दर्शवली परंतु घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे त्याने मोठ्या शहरात जाणे टाळून वडवणी येथील सिंदफना माध्यमिक विद्यालयात बारावीचे शिक्षण पूर्ण करत असताना त्याला व्यवसाय क्षेत्रात उतरण्याची इच्छा झाली. पण तेव्हाच टंकलेखन परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झाल्यामुळे त्याने स्पर्धा परीक्षेत उतरून मोठा अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले..! बीड येथे बलभीम महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत त्याने लघुलेखन (शॉर्टहँड) चे खाजगी प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. सातत्य, जिद्द व चिकाटीच्या जोरावर त्याने लघुलेखन/स्टेनो क्षेत्रात अव्वल दर्जा प्राप्त केला व महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच जिल्हा न्यायालय भरतीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली..! तेव्हाच जगावर पसरलेल्या कोरोना संकटाचा सामना विठ्ठलला सुद्धा करावा लागला व शहर सोडून गावी परतावे लागले... पण त्यांनी हार न मानता शेतात आई वडिलांसोबत काम करत अभ्यास चालूच ठेवला व अनेक स्पर्धा परीक्षा दिल्या २०२५ पासून निकाल येण्यास सुरुवात झाली. जिल्हा न्यायालय बीड येथे शिपाई, लिपिक लघुलेखक तसेच वन विभागात स्टेनोग्राफर वर्ग २ अधिकारी (गट - ब) आणि आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मंत्रालय लघुटंकलेखक तसेच नि. श्रे. लघुलेखक अशा अनेक पदांकरिता निवड झाली. यापुढे सुद्धा असच अभ्यास करत क्लास ०१ ची तयारी ते करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### अनेक दिवसांची मागणी असलेली रस्ता कामे पूर्ण होत आहेत...

# ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी दर्जेदार रस्त्यांची कामे करावीत : आ.सुरेश धस



● यावर्षी एप्रिल महिन्यापासूनच पाऊस सुरू झाल्यामुळे हे नैसर्गिक संकट उद्धवले आणि त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात झालेल्या पावसामुळे वादळामुळे विजेचे पोल मोठ्या प्रमाणावर पडले असून तालुक्यातील अनेक गावांमध्ये मिळून सुमारे ७०० ते ८०० पोल पडले आहेत त्यातील साडेचारशे होल चे काम उभारणीचे काम सुरू असून लवकरच बाकीचे पण उभारून वीज पुरवठा सुरळीत करण्यात येईल पारोडी आणि बोरोडी परिसरातील दोन वीज उपकेंद्रांचे काम देखील लवकरात लवकर सुरू होईल असे देखील आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

● जून २० २६ अखेर शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलाव भूमिगत पाईप लाईन चे काम पूर्ण होऊन या पाईपलाईन द्वारे खुंटेफळ साठवण तलावामध्ये पाणी सोडण्याचा शुभारंभ करण्याचा प्रयत्न चालू आहे अशी माहिती ही आमदार सुरेश धस यांनी दिली.

● कर्जमाफी जून पर्यंत करण्याची तयारी

**आष्टी । प्रतिनिधी**

दर्जेदार रस्त्यांची कामे झाल्याशिवाय विकासाचा मार्ग उपलब्ध होत नसल्याने गेल्या अनेक दिवसांपासून मागणी होत असलेली रस्ता कामे आज सुरू होत आहेत जिल्हा नियोजन व विकास निधीतून ही कामे होत आहेत संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांनी या रस्त्याचा दर्जा चांगला राहील याकडे लक्ष द्यावे आणि सर्व संबंधित गावातील गावकऱ्यांनी देखील या रस्ता कामांवर लक्ष ठेवून चांगले काम करून घ्यावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी तालुक्यातील अंभोरा नांदूर आणि खरड गव्हाण फाटा येथील रस्ता शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, उद्धव बापू दरेकर,जयसिंग गव्हाणे,दत्तोबा वाडेकर, सुखदेव खकाळ, सागर आमले,संजय ढोबळे, अंकुश चव्हाण, सुखदेव खळाळ, रमेश गावडे, अनिल ढोबळे, अशोक इथापे, राजेंद्र दहातोंडे, रावसाहेब शिरसाठ,रामहरी महारनोर, उप अभियंता मधुकर निंबाळकर, शाखा अभियंता सुनील राठोड, शाखा अभियंता ढोबळे, रामेश्वर चव्हाण,मनोज थोरवे, जयसिंग गव्हाणे, रामहरी महारनोर, गोपाळ रक्ताटे,अमर वाळके,विकास अमृते,सरपंच सौ. मंगला विधाते, बलभीम विधाते, अजिनाथ विधाते, ▶▶ उर्वरित पान २ वर

## ३६ व्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या पदक विजेत्या खेळाडूंचा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या हस्ते सत्कार



**●रिवॉर्डची घोषणा**

खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी खालीलप्रमाणे आर्थिक रिवॉर्ड जाहीर केला– सुवर्ण पदक विजेते – प्रत्येकी २,०००/–, रौप्य पदक विजेते – प्रत्येकी १,५००/–, कांस्य पदक विजेते – प्रत्येकी १,०००/– या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, खेळाडू व अधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**बीड । प्रतिनिधी**

३६ वी परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे अत्यंत उत्साहात पार पडली असून, या स्पर्धेमध्ये बीड जिल्हा पोलीस दलातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे. या चमकदार यशाबद्दल पदकविजेत्या सर्व खेळाडूंचा भव्य सत्कार व अभिनंदन सोहळा पोलीस मुख्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सर्व खेळाडूंचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कारकेला.▶उर्वरितपान२वर

## 'नगराध्यक्षा' पदासाठी आज सौ.वृषालीताई नितीन जायभाये यांचा 'आप'च्या झाडू या अधिकृत चिन्हावर अन्य ११ उमेदवारांसह अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

'मरहूम अतहर बाबर साहब शहर विकास आघाडी व बीड शहर बचाव मंच' च्या पुरस्कृत 'आप'च्या अधिकृत उमेदवार सौ. वृशालीताई नितीन जायभाये यांनी आज नगराध्यक्ष पदासाठी व वार्ड क्रमांक १३ तील एस सी महिला राखीव या जागेसाठी 'आम आदमी पार्टीच्या' झाडू या अधिकृत चिन्हावर नगरसेवक पदाच्या पहिल्या टप्प्यातील ११ उमेदवारांसह नामनिर्देशन पत्र/ अर्ज दाखल केला. यावेळी 'मरहुम अतहर बाबर साहब शहर विकास



आघाडी व बीड शहर मंचाचे' निमंत्रकअध्यक्ष प्रवर्तक नितिन जायभाये हे प्रमुख उपस्थितीत होते. बीड नगर परिषदेची निवडणूक येत्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. निवडणूक प्रक्रिया चालू आहे. बीड शहर बचाव मंच व त्यांचे मित्र पक्ष यांनी मिळून नगरपरिषद निवडणूक लढवण्याचा निश्चित निर्णय घेऊन डाव्या विचारांच्या सर्व पक्ष संघटनांना सोबत घेत अतहर बाबर साहब शहर विकास आघाडी तयार केली आहे. तरी पहिल्या १५० दिवसांमध्ये बीड नगरपालिका शहरातील नागरी समस्या हमीने सोडवण्यासाठी विकासाच्या दृष्टीने कशी दिशा घेणार आहे व मरहूम अथहर बाबर साहब यांच्या स्वप्नातील बीड नगरी साकारण्याच्या अनुषंगाने बीड शहर बचाव मंच कशा पद्धतीने काम करणार आहे या दृष्टीने ने हमीनामा प्रकाशित केला आहे ज्यामध्ये १) नियमीत स्वच्छता मोहीम राबवून ▶▶ उर्वरित पान २ वर

## आम आदमी पार्टीकडून प्रभाग 6 मधील अँड पूजा शहाणे आणि पत्रकार पठाण अमरजान निवडणूक रिंगणात

**महिला विधीतज्ञ व युवा पत्रकार ठरणार नागरिकांची पहिली पसंत**

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषद निवडणूक २०२५ च्या तयारीला वेग आला असून विविध पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीने प्रभाग क्रमांक सहा परिसरात आपली उपस्थिती मजबूत करत दोन उमेदवारांना मैदानात उतरवले आहे.

प्रभाग क्रमांक ६ (अ) मधून अँड पूजा गणेश शहाणे यांनी आज उत्साहपूर्ण वातावरणात उमेदवारी अर्ज दाखल केला.सामाजिक बांधिलकी,नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवणे,स्वच्छता आणि महिलांच्या सुरक्षा या विषयांवर



काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. स्थानिक नागरिक, महिलांचा समूह आणि काही समाजघटकांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करण्यात आला. दरम्यान, प्रभाग क्रमांक ६ (ब) मधून पत्रकार पठाण अमरजान आजम खान यांनी आम आदमी पार्टीच्या तिकिटावर उमेदवारी अर्ज दाखल केला. दीर्घकाळ पत्रकारिता क्षेत्रात काम करताना सामान्य नागरिकांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## नगरसेवक पदाच्या दावेदार उमेदवार वार्ड क्र. एक मधून सौ. कोकिळा लक्ष्मण दादा पवळ यांचा उमेदवारी दाखल

**बीड । प्रतिनिधी**

वार्ड क्रमांक एक मधून सौ कोकिळा लक्ष्मण दादा पवळ यांचा काल दिनांक १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

उमेदवारी दाखल करत असताना सोबत परवेज भाई कुरेशी, दादासाहेब बजगुडे तालुका अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष सोनवणे यांच्या समवेत उमेदवारी अर्ज दाखल केला. ही उमेदवारी अशोक पाटील व माजी खासदार रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिली आहे. कोकिळा पवळ ह्या राजीव गांधी पंचायत संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण दादा पवळ यांच्या पत्नी आहेत. दादांचे आज पर्यंत चे सामाजिक कार्य लक्षात घेऊन वार्ड क्रमांक एक च्या जनतेने



त्यांना उमेदवारी देण्याचा आग्रह केला होता. जनतेने दिलेल्या विश्वास म्हणजे दादांच्या कार्याची दखल घेतली त्यांचे कार्य लोकांना आवडत गेले त्यामुळे दादांच्या पत्नी सौ. कोकिळा यांना पसंती दिल्यामुळे दादाणी पुढाकार घेऊन त्यांच्या पत्नी कोकिळा पवळ यांचा उमेदवारी अर्ज वार्ड क्रमांक एक मधील जनतेच्या आग्रहास्तव भरला आहे. त्याचे कारणही तसे आहे की, दादांनी आजपर्यंत कोणत्याही जाती धर्माचा असो त्यांचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## कल्याणस्वामी संस्थांनचा कलशारोहन सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह

**नामांकित कीर्तनकार हजेरी लावणार ; लाखो भाविकांनी लाभ घ्यावा– कीर्तनकार सोनाली दिदि यांच्या आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या मंदिराचा भव्य कलशारोहण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, ११ कोटी नामजप, त्रिकाल हरिपाठ कार्यक्रमाचे दिनांक १८ नोव्हेंबर पासून आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध, नामांकित कीर्तनकाराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या



अध्यक्षा ह.भ.प. साध्वी सोनाली दिदि यांनी दिली. यावेळी संस्थांचे उपाध्यक्ष तथा महंत ईश्वर स्वरूप चैतन्य महाराज यांची उपस्थित होती. याप्रसंगी बोलताना साध्वी सोनाली दीदी म्हणाल्या, श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान हे गेल्या पाचशे वर्षां पूर्वीचे जुने संस्थान आहे. या ठिकाणी वंशपरंपरागत नववी पिढी आज अध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थांनचा जीर्णो द्धाराचे काम हाती घेण्यात आले ▶▶ उर्वरित पान २ वर

## अहिल्यानगर नाव बदललं पण पाटोदा–चुंबुळी मार्गावरचे बोर्ड अजूनही 'अहमदनगर' ; प्रवाशांची दिशाभूल, प्रशासनाचा गलथान कारभार उघड!



**पाटोदा । प्रतिनिधी**

राज्य सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून 'अहिल्यानगर' असे अधिकृतपणे जाहीर करून अनेक वर्ष झाले असतानाही पाटोदा–चुंबुळी महामार्गावरील दिशादर्शक फलकांवर अजूनही 'अहमदनगर' हे जुने नावच दिसत असल्याने प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात गोंधळ उडत आहे.या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना नेमकी दिशा कोणती, आणि कोणता मार्ग योग्य हे समजत नसल्याने सतत संभ्रम निर्माण होत आहे. विशेषत: बाहेरील जिल्ह्यांतून येणाऱ्या नागरिकांची दिशाभूल होत असून अनेकांना चुकीच्या मार्गावर जावे लागत असल्याची तक्रार समोर येत आहे.स्थानिक नागरिकांनी व्यक्त केलेल्या नाराजीमध्ये जिल्ह्याचे नाव बदलले, सरकारी आदेश आले पण बोर्ड बदलण्याची प्रशासनाला फुरसत नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. जुने नाव असलेले फलक अद्याप बदलले न गेल्याने प्रशासनाचा गलथान व बेफिकीर कारभार उघड झाल्याची टीका होत आहे.या संदर्भात संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन दिशादर्शक फलकावरील नाव अद्ययावत करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बहुजनांच्या मान- सन्मान आणि स्वाभिमानासाठी सुषमा राजू जोगदंड निवडणुकीच्या मैदानात

**बीड पालिकेच्या अध्यक्षपदासाठी सुषमाताईंनी दाखल केला उमेदवारी अर्ज ; शहरातील घाणी, अनागोंदी आणि फुटक्या आश्वासनांना दिले आव्हान**



**● शहरातील वाढत्या ढिगाऱ्यांनी नागरिक त्रस्त**

शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांची दुर्दशा, नाल्यांचे नियोजन नसणे, वाढत चाललेली घाण, पाणीपुरवठ्याची अनियमितता आणि प्रशासनाचा निष्क्रियपणा या समस्यांमुळे नागरिक नित्य त्रास सहन करत आहेत. विकासाच्या नावावर केवळ घोषणा आणि गप्पा मारल्या गेल्याने शहराचा विकास ठप्प झाला आहे. या पार्श्वभूमीवर सुषमाताईंनी सामान्य लोकांनीच समाधानाची पहिली पायरी चढायला हवी या विचारातून मैदानात उतरायचा निर्णय घेतला.

**● शहराच्या बदलासाठी सुस्पष्ट आणि प्रमाणिक भूमिका महिला नेतृत्व – शहर बदलाचा नवा अध्याय**

सामान्य कुटुंबातील महिला असूनही शहरातील परिस्थिती प्रत्यक्ष अनुभवत त्यांनी समस्यांचा अभ्यास केला. नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाल्यास पारदर्शक नगरपरिषद कारभार, भ्रष्टाचारमुक्त यंत्रणा, स्वच्छ आणि सुंदर बीड, महिलांसाठी स्वतंत्र उपक्रम, युवकांसाठी रोजगारसंधी, नागरिकांशी थेट संवाद अशा पद्धतीने पारदर्शक काम केले जाणार असल्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

**बीड । प्रतिनिधी**

फुफाटे, घाणीचे साम्राज्य आणि वाढत्या समस्यांमध्ये अडकलेल्या बीड शहराचा चेहरा बदलण्यासाठी तसेच बहुजन समाजाचा मान–सन्मान व स्वाभिमान जपण्यासाठी पत्रकार राजू जोगदंड यांच्या पत्नी सुषमा राजू जोगदंड यांनी बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. रविवारी (दि. १६) निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांच्या कार्यालयात त्यांनी अगदी साध्या पद्धतीने आपला अर्ज सादर केला. यावेळी पत्रकार राजू जोगदंड, बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष भीमराव कुट्टे यांची उपस्थिती होती. गेल्या अनेक वर्षांपासून शहरात मूलभूत सुविधांचा प्रश्न गंभीर बनला आहे. विविध भागांमध्ये कचरा, रस्ते, पाणीपुरवठा आणि अनियोजित कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली केवळ घोषणांचा पिंपळपान झाल्याने नागरिकांच्या समस्यांचा डोंगर दिवसेंदिवस वाढतच गेला आहे. या पार्श्वभूमीवर सामान्य ▶▶ उर्वरित पान २ वर